IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ आणि कौटिल्यांचा सप्तांग सिध्दांत : तुलनात्मक विश्लेषण

प्रा. डॉ. आनंद शिंदे
सहयोगी प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हणेगांव ता. देगलूर जि. नांदेड, महाराष्ट्र

**सारांश :** भारतीय इतिहासाच्या दृष्टीने मौर्यकाळ आणि मराठा काळ हे दोन्ही कालखंड अतिशय महत्त्वाचे असून मौर्यांच्या काळात भारताचा साम्राज्यविस्तार काबूल-कंधार पर्यंत झाला; तर मराठ्यांनी स्वराज्याचे रुपांतर साम्राज्यात करुन अटकेपार झेंडे लावले. ऐतिहासिकदृष्ट्या या दोन कालखंडातील अंतर खूप मोठे असले तरी या दोन्ही कालखंडाने युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व भारताला दिले. कौटिल्यांचा कालखंड हा इसवीसन पूर्व 329 मानला जातो तर छत्रपती शिवाजी महाराजांचे कृतुत्व 17 व्या शतकातील आहे. या दोन्ही महापुरुषांची सुरुवात ही शून्यातून झालेली आहे. कौटिल्यानी नंद घराण्याची सत्ता उलथून मौर्य घराण्याची सत्ता स्थापन केली तर शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण स्वतःच्या कर्तबगारीने बांधले. दोघांनीही स्वाभिमान, त्याग, बलिदान, राष्ट्रनिष्ठा या मौलिक शिकवणूकी बरोबरच आदर्श राजा, आदर्श राज्य, आदर्श समाज यांचा आदर्श वस्तुपाठ समाजाला घालवून दिला. हजारो आणि शेकडो वर्षांनंतरही या दोन्ही महापुरुषांच्या विचारांचे गारुड आजही भारतीय समाजमनावर तितकेच आहे. आदर्श राजा आणि आदर्श राज्य यांची दोघांचीही परिभाषा केवळ पुस्तकी परिपाठाची आदर्शवत आणि सैद्धांतिक नव्हती तर ती तर्कशुध्द अशा विवेकी विचारांवर आधारलेली होती. दोघांनीही 'राष्ट्र पहिले' व 'राष्ट्रहित' हा विचार रुजवून त्याच्या संरक्षणार्थ आवश्यक त्या योजना सांगितल्या आहेत. भारताच्या राजकीय व प्रशासकीय दृष्टीकोनातून दोन्ही कालखंड अत्यंत महत्वपूर्ण असून दोघांनीही सैद्धांतिक आणि व्यावहारिक विचारांची देन दिलेली आहे. भारतीय राजकारण आणि प्रशासनासाठी दोघांचेही विचार मार्गदर्शक स्वरुपाचे असून कालखंड भिन्न असला तरी दोघांच्या विचारात विलक्षण साम्य आणि भेद असल्याचे दिसून येते.

**बीज संज्ञा :** अमात्य, दंड, पेशवा, सुमंत, मीत्र

## 1. प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराज आणि कौटिल्य ही भारताच्या इतिहासातील उत्तुंग व्यक्तिमत्वे आहेत. इसवीसनपूर्व कालखंडात कौटिल्यांनी आदर्श राजा आणि आदर्श राज्य कसे असावे याचा उत्तम पाठ शिकवला तर मध्ययुगात छत्रपती शिवाजी महाराजांनी या दोन्ही बाबींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन दाखवले. प्राचीन ग्रीक आणि युरोपीयन विचारवंत सॉक्रिटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल आदींनी राज्यसंस्थेविषयी मांडलेल्या विचाराप्रमाणे इसवीसनपूर्व काळात कौटिल्यांनी तात्त्विक कमी परंतु व्यावहारिक जास्त मांडले. पाश्चिमात्य विचारवंत मॅकॅव्हली याच्याशी कौटिल्यांची तुलना करताना कौटिल्यांना भारताचा मॅकॅव्हली असे म्हणतात. परंतु मॅकॅव्हलीचा कालखंड मध्ययुगातील आहे तर कौटील्यांचे राजसंस्थेविषयीचे विचार इसवीसनपूर्व काळातील आहेत. भारतीय राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचे स्वदेशी प्रारुप निर्धारित करतांना कौटिल्यांनी आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथातून मांडलेले सिद्धांत खुप प्रगल्भ स्वरुपाचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आज्ञापत्र, बखरी, पत्रे इत्यादी ऐतिहासिक साधनांमधून शिवकालीन प्रशासकीय व राजकीय व्यवस्था लक्षात येते. कालखंडाचा विचार करता कौटील्य आणि शिवाजी महाराज यांच्यातील अंतर सुमारे दोन हजार वर्षाहून अधिक आहे. शिवकालीन अष्टप्रधानमंडळ आणि कौटील्यप्रणित सप्तांग सिध्दांतातील घटक हे दोन्ही प्रशासन व्यवस्थेचे घटक आणि त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करणाऱ्या आहेत. परंतु दोघांनी उभारलेल्या प्रशासकीय यंत्रणेत अनेक बाबतीत साम्य तर काही बाबतीत टोकाचा फरक आहे. अर्थात या दोन्ही व्यवस्था या कालसुसंगत होत्या; म्हणूनच कौटिल्यांच्या विचाराने पायाभरणी झालेल्या मौर्य घराण्याची सत्ता दीर्घकालीन ठरली आणि छत्रपतींनी उभारलेले स्वराज्य साम्राज्यात रुपांतरीत झाले. या दोन्ही महापुरुषांच्या कृतुत्वाने भारतीय

इतिहासाला कलाटणी मिळाली. ऐतिहासिकदृष्ट्या अनेक अंगाने या दोन्ही कालखंडाचा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो परंतु या दोन्ही कालखंडातील केवळ प्रशासकीय व्यवस्थेच्या प्रारुपाचे तुलनात्मक विवेचन करणे हे या संशोधन लेखाचा हेतू आहे.

## 2. उदिष्टये

1. कौटिल्यप्रणित सप्तांग सिद्धांत आणि अष्टप्रधानमंडळ अनुरूप प्रशासकीय व्यवस्थेचे राष्ट्र उभारणीतील योगदान अभ्यासणे.
2. सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्ट्या मौर्यकालीन आणि शिवकालीन प्रशासकीय व्यवस्थेची उपयुक्तता अभ्यासणे.
3. मौर्यकालीन आणि शिवकालीन प्रशासकीय व्यवस्थेचे तुलनात्मक विवेचन करणे.
4. सप्तांग सिद्धांतील घटक व अष्टप्रधानमंडळातील घटक यांतील साम्य व भेद अभ्यासणे.

## 3. गृहितके

1. मौर्यकालीन व शिवकालीन प्रशासकीय व्यवस्थेवर प्राचीन आणि वैदिक कालखंडातील ग्रंथांचा प्रभाव दिसतो.
2. सप्तांग सिद्धांतातील काही अंग आणि अष्टप्रधानमंडळातील काही घटक आजही प्रासंगिक आहेत.
3. स्थिर राजसत्ता आणि पारदर्शक व गतिमान प्रशासनासाठी कौटिल्य आणि छत्रपती शिवाजी महाराज दोघांचेही योगदान समतुल्य आहे.
4. अष्टप्रधानमंडळ कल्याणकारी राज्याची तर सप्तांग सिध्दांत मजबूत राज्याची हमी देते.

## 4. तथ्य संकलन आणि संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन लेखासाठी मुख्यत्वे अन्वेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून दोन भिन्न कालखंडातील प्रशासकीय व्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी तुलनात्मक संशोधन पद्धतीचाही अवलंब करण्यात आला आहे. सदरील शोध लेखासाठी तथ्य संकलनाच्या द्वितीयक स्त्रोतातील विविध संदर्भ ग्रंथ, तत्कालीन उपलब्ध साधनसामग्री यांचा वापर करण्यात आला आहे. विषयाशी संबंधित विविध मासिके, वृतमान पत्रातील लेख, इंटरनेटवरील विविध संकेतस्थळावर उपलब्ध असलेली अधिकृत माहिती यांचा वापर अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

- **अष्टप्रधानमंडळ**

शिवाजी महाराजांनी जिंकलेल्या प्रदेशाचे अर्थात स्वराज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेची घडी बसवताना मुख्य प्रशासकीय यंत्रणा म्हणून अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. ज्यात आठ प्रमुख मंत्री होते. या अष्टप्रधानमंडळातील प्रत्येक मंत्र्यांचे कर्तव्ये आणि जबाबदारी भिन्न स्वरुपाची होती. स्वराज्याचे कार्यक्षमतेने व्यवस्थापन करण्यासाठी महाराजांनी ही व्यवस्था निर्माण केली होती.

1. **पेशवे (मुख्य प्रधान):**
   शिवकालीन प्रशासकीय व्यवस्थेचा प्रमुख, राज्याच्या सामान्य कामकाजावर देखरेख ठेवणे आणि राजाला सल्ला देणे ही जबाबदारी पेशव्याची होती.
2. **अमात्य (मुजूमदार तथा अर्थमंत्री):**
   राज्याचे आर्थिक व्यवस्थापन करणे, कर तथा महसूल संकलन आणि खर्च यांवर देखरेख ठेवणे.
3. **सुरनीस/सचिव (सचिव):**
   राजाचे पत्रव्यवहार, परराष्ट्र व्यवहार अधिकृत नोंदी व दस्तऐवज हाताळणे.
4. **मंत्री (आंतरिक मंत्री):**
   स्वराज्या अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करणे आणि गुप्तचर यंत्रणेचे कामकाज पाहण्याची जबाबदारी ही या मंत्र्यांवर होती.
5. **सेनापती (सरनौबत):**
   स्वराज्याचे संरक्षण, लष्करी दलांचे नेतृत्व करणे आणि संरक्षण रणनीती व लष्करी मोहिमा आखणे.
6. **सुमंत/डबीर(परराष्ट्र मंत्री):**
   स्वराज्याचा परराष्ट्र व्यवहार, पत्रव्यवहार, राजनैतिक संबंध पाहणे.
7. **न्यायाधिश (मुख्य न्यायाधीश):**
   न्यायव्यवस्थेवर देखरेख ठेवणे आणि न्यायदान करणे.
8. **पंडितराव (धर्मशास्त्री):**
   धार्मिक बाबींवर देखरेख ठेवणे आणि राजाची व राज्याची धोरणे धर्माशी अर्थात नैतिक मूल्यांशी सुसंगत असल्याची खात्री करणे.

अष्टप्रधान मंडळाच्या निमित्ताने शिवकाळात केंद्रीय प्रशासकीय व्यवस्थेचे हे आठ आधारस्तंभ होते; जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पश्चातही कार्यरत राहिले. त्या काळात विशिष्ट कार्यासाठी ही वेगवेगळी पदे निर्माण केली होती परंतु यातील अनेकांना स्वराज्याच्या

संरक्षणासाठी लढाईवर सुद्धा जावावे लागत होते. कार्यविभाजनाच्या दृष्टीने प्रत्येकाची जबाबदारी भिन्न असली तरी यातील अनेकांना संकटसमयी मोहिमेवर जावे लागत असत.

- **कौटील्यांचा सप्तांग सिद्धांत**

कौटील्यांनी मांडलेल्या सप्तांग सिद्धांतानुसार राज्यव्यवस्थेचे हे सात अंगे आहेत; ज्याच्या माध्यमातून संपूर्ण प्रशासकीय व्यवस्था संचलित होत होती. राज्याची ही सातही अंग परस्परावलंबी असून यावरुन मौर्यकालीन प्रशासकीय व्यवस्थेची कल्पना येते.

1. **स्वामी (राजा) :**

कौटिल्यांनी स्वामी अर्थात राजाला सार्वभौम शासक मानलेले आहे. प्रजेचे रक्षण करणे आणि त्यांची सेवा करणे ही राज्याची प्राथमिक जबाबदारी मानलेली आहे. कौटिल्यांनी राजाची पात्रता सांगताना तो उच्चकुलीन असावा असे म्हंटले आहे.

2. **अमात्य (मंत्री) :**

राज्याच्या कारभारासाठी धोरण तयार करणे आणि अंमलबजावणी करण्यात मदत करणारे प्रमुख सल्लागार आणि प्रशासक म्हणून अमात्याला महत्त्वाचे स्थान आहे. अमात्य हा राजाचा विश्वासू आणि मंत्रीमंडळातील प्रमुख मंत्री म्हणून ओळखला जातो.

3. **जनपद (प्रदेश आणि लोक):**

राज्याची जमीन आणि त्यावर वास्तव्य करणारी जनता म्हणजे जनपद; ज्यांना कौटिल्यांनी राज्याच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण अंग मानलेले आहे.

4. **दुर्ग (किल्ला):**

तत्कालीन परिस्थितीत किल्ल्याला असलेले महत्त्व लक्षात घेऊन कौटिल्यांनी संरक्षण आणि आर्थिक स्थिरतेसाठी किल्ला हा महत्त्वाचा घटक मानलेले आहे.

5. **कोष (कोषागार):**

राज्याच्या सुव्यवस्थित संचलनासाठी वित्तिय व्यवस्थेचे महत्व लक्षात घेऊन कौटिल्यांनी कोष हे राज्याचे महत्त्वपूर्ण अंग मानलेले आहे.

6. **दंड (सैन्य):**

राज्याच्या अस्तित्वासाठी बाह्य आक्रमणापासून संरक्षण आणि अंतर्गत सुव्यवस्था राखण्यासाठी लष्करी दलाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

7. **मित्र (मित्र):**

राज्याची परराष्ट्र नीती व राजनैतिक संबंध विश्लेषित करणारे हे शेवटचे महत्त्वाचे अंग आहे. कौटिल्यांनी राज्याच्या शेजारी असलेल्या राष्ट्रांसोबतचे संबंध विवेचन करताना मित्र आणि शत्रू राष्ट्रांची व्याख्या परिभाषित केली आहे. मित्र हा कुलीन नि:संदेही, महान तथा खानदानी असावा ज्यामुळे त्याच्या सोबत मतभेद होणार नाहीत व तो प्रसंगी मदतीला येईल.

कौटिल्यांच्या या सिध्दांतानुसार राज्याच्या निर्मिती अथवा अस्तित्वासाठी या सातही अंगांची भूमिका तेवढीच महत्त्वाची मानलेली आहे. राज्य हे एका विशाल वृक्षाप्रमाणे आहे, ज्या पद्धतीने वृक्ष आपल्या मुळांवर टिकून राहतो तद्वत राज्य सुद्धा या सात अंगांवर टिकून असते. राज्याच्या सात अंगांचा उल्लेख प्राचीन वैदिक ग्रंथ किंवा धर्म सूत्रांमध्ये दिसत नाही परंतु कौटिल्यांच्या सप्तांग सिद्धांतातील सात अंगांची चर्चा ही मनूच्या स्मृतीमध्ये पहावयास मिळते. तथापि पूर्ण राज्याची सआवयवी संकल्पना कौटिल्यांच्या सप्तांग सिद्धांतातून कळते.

- **तुलनात्मक विश्लेषण :**

दोन्ही प्रणाली वेगवेगळ्या ऐतिहासिक कालखंडात आणि भिन्न संदर्भाने विकसित झालेल्या असल्या तरी, त्यांच्या मूलभूत तत्त्वांमध्ये उल्लेखनीय समानता आणि फरक दिसून येतात. कौटिल्यांनी सांगितलेल्या सप्तांग सिध्दांतात आणि शिवरायांनी अनुसरलेल्या अष्टप्रधानमंडळात वर्तमान मजबूत भारतीय प्रशासकीय व्यवस्थेचे प्रतिबिंब दिसून येते. अर्थात काल सुसंगत काही घटक हे आजच्या प्रशासकीय व राजकीय व्यवस्थेसाठी प्रासंगिक नसतीलही तथापि दोघांनी उभारलेल्या प्रशासकीय व्यवस्थेचे अनेक अवशेष आजच्या भारतीय प्रशासकीय व्यवस्थेत पहावयास मिळतात.

1. **प्रबळ केंद्रीय सत्ता :**

कौटिल्य आणि छत्रपती शिवाजी महाराज दोघांनीही प्रबळ केंद्रीय सत्तेचा पुरस्कार केलेला आहे. दोन्ही कालखंडात अगदी गावपातळीपर्यंत प्रशासनाचा ग्राम हा घटक अस्तित्वात असला तरी तथा प्रशासकीय व्यवस्थेचे विकेंद्रीकरण झाले असले तरी राजा हा सर्वेसर्वा राहीलेला आहे. दोन्ही कालखंडात राज्याच्या मदतीला असलेल्या मंत्र्यांचे अधिकार आणि स्थान महत्त्वाचे राहीलेले आहे. राजाचा शब्द हा अंतिम असला तरी प्रत्येक मंत्र्यांची भूमिका महत्वाची मानली जाते. राज्यकारभारासाठी मंत्रीमंडळाची संकल्पना ही भारतासाठी नवीन नाही. अगदी वैदिक काळापासून सभा आणि समितीचे अस्तित्व होते. महाभारत, रामायणासह, शुक्रनिती, मनुस्मृती, याज्ञवल्क्याच्या स्मृतीमध्येही अशा प्रकारच्या राजाला सल्ला देणाऱ्या मंत्रीमंडळाचे महत्त्व होते. महाभारतातील शांतिपर्वात राजाला

राजधर्माचे पालन करताना अशा सल्लागाराची आवश्यकता सांगितली आहे. वरील अनेक पौराणिक आणि वैदिक संदर्भ शिवकालीन अष्टप्रधानमंडळात सापडतात.

परकीय आक्रमणापासून राज्याला सुरक्षित ठेवण्यासाठी मुजबूत केंद्रीय सत्तेचा पुरस्कार शिवाजी महाराज आणि कौटिल्य दोघांनीही केला आहे. तसेच राज्या अंतर्गत बंड किंवा विद्रोह मोडून काढण्यासाठी शक्तिशाली केंद्रीय सत्तेचा आग्रह धरलेला आहे.

**2. न्यायप्रिय शासन :**

अष्टप्रधानमंडळातील न्यायधिशाचे स्वतंत्र स्थान व शिवाजी महाराजांची न्यायाप्रति असलेली भूमिका लक्षात घेता शिवकालीन प्रशासन आणि शासन हे न्यायप्रिय होते हे लक्षात येते. शिवकालीन न्यायव्यवस्था ही धर्म, वर्ण, जात, लिंग निरपेक्ष होती. रांज्याच्या पाटलाचा न्यायनिवाड्यातून शिवकालीन न्यायव्यवस्था ही सर्वांसाठी समान होती हे लक्षात येते. कौटिल्याच्या सप्तांग सिद्धांतातील दंड हे कठोर न्यायव्यवस्थेचे उदाहरण होते. मौर्यकाळात वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी वेगवेगळ्या प्रकाराची दंड व्यवस्था होती. कौटिल्यांनी आपल्या अर्थशास्त्रात अपराध आणि त्यासाठी दंड व्यवस्थेचे विस्तृत विवेचन केले आहे. एखाद्याने तलाव फोडला असेल तर त्याला त्याच तलावात बुडवण्याची शिक्षा सांगितली आहे. राष्ट्र द्रोह करणाऱ्यास देहदंडाची शिक्षा तर व्याभिचार करणाऱ्यास कठोर आणि क्रुर पध्दतीची शिक्षा सांगितलेली आहे. दंड व्यवस्थेबाबत कौटिल्याचे निरिक्षण हे फार सुक्ष्म होते हे लक्षात येते. गुन्हेगार आणि गुन्हेगारी प्रवृत्ती बाबत कौटील्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या अनेकविध शिक्षा सांगितलेल्या आहेत. प्रशासनातील शिस्तीबाबत शिवाजी महाराजही फारच जागरुक होते. रयतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी महाराजांनी घेतलेली होती. अपराधी आप्तस्वकीय जरी असला तरी शिवाजी महाराजांनी माफी दिलेली नाही.

**3. वित्तिय व्यवस्थापन :**

दोघांनीही राज्यासाठी आर्थिक व्यवस्थापन महत्त्वाचे असल्याचे ओळखले आहे. दोन्ही कालखंडात वित्तिय व्यवस्थापणासाठी अमात्यांच्या भूमिका राज्य स्थिरता आणि समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण राहीलेली आहे. सप्तांग सिद्धांतात राज्यासाठी कोष हे अंग शरीरातील रक्ताप्रमाणे मानलेले आहे. शिवकाळात राज्याचा आर्थिक व्यवहार, कर संकलन, महसूल व्यवस्था यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी ही आमात्याची राहीलेली आहे. जनतेकडून वसूल होणारा कर, शेतसारा यांच्या नोंदी, लुटीतून प्राप्त झालेली संपती यांचा हिशोब ठेवण्याची पद्धती शिवकाळात रूढ होती. शिवाजी महाराजांनी त्याकाळी रूढ असलेली वतनदारी व जहागीरदारी पद्धती बरखास्त करून स्वराज्याच्या प्रत्येक सेवकास अगदी अष्टप्रधानमंडळातील मंत्र्यानांही रोख स्वरुपात वेतन अदा करण्याची पद्धती अवलंबवली होती. शिवाजी महाराजांनी त्याकाळी दाखवलेले हे धाडस स्वराज्याच्या आर्थिक हिताचे आणि रयतेच्या कल्याणासाठी महत्वाचे मानले जाते.

**4. पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त प्रशासकीय व्यवस्था :**

कौटिल्य आणि शिवाजी महाराजांनी आपली प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक आणि भ्रष्टाचार मूक्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. राज्याच्या आर्थिक शिस्त आणि आर्थिक व्यवहाराबाबतीत शिवाजी महाराजांच्या तुलनेत कौटील्य हे अधिक जागरूक असल्याचे दिसून येते. राज्याच्या खजिन्याबाबतीत तथा कर संकलनाबाबतीत कौटिल्यांनी विविध सावधगिरीचे उपाय सांगितले आहेत. शिवाय भ्रष्टाचारातून राज्याच्या खजिन्याची हाणी कशी होते तथा त्यावर कसे उपाय करावेत याबाबत कौटिल्यांनी सविस्तर मार्गदर्शन केलेले आहे. कौटील्यांनी आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात भ्रष्टाचाराचे एकूण चाळीस प्रकार सांगितले आहेत. तसेच भ्रष्टाचाराच्या प्रकारानुसार वेगवेगळ्या प्रकाराच्या शिक्षाही सांगितलेल्या आहेत. भ्रष्टाचार ही सहज प्रवृत्ती असून जिभेवर ठेवलेल्या मधाला प्राशन करणे इतके ते सोपे आहे किंवा पाण्यातील मासा पाणी पिण्याइतकी ती सहज बाब आहे असे म्हटले आहे. त्यामुळे भ्रष्टाचारासाठी कठोर दंडाचे समर्थन कौटिल्यांनी केले आहे. भ्रष्टाचारा बाबतीत कौटील्यांनी सांगितलेली उदाहरणे हे आजच्या वर्तमान प्रशासनास जशास तसे लागू आहेत.

**5. स्वतंत्र विदेश नीती :**

कौटिल्य आणि छत्रपती शिवाजी महाराज दोघांनीही स्वतंत्र विदेश नीतीला प्राधान्य दिले आहे. अष्टप्रधानमंडळातील सुमंत हा मंत्री परराष्ट्र व्यवहारासाठी जवाबदार होता. शिवाजी महाराजांच्या काळात स्वराज्याच्या सभोवताली वेगवेगळ्या मुस्लिम शाह्यांच्या सत्ता आणि इंग्रज, डच, पोर्तुगीज, फ्रेंच आदी वखारी होत्या. त्यामुळे परराष्ट्रांशी संबंध ठेवताना जो मुत्सद्दीपणा आणि शहाणपणा हवे असते ते छत्रपती शिवाजी महाराजांकडे होते. कौटिल्याच्या सप्तांग सिद्धांतातील मित्र हे अंग राज्याची परराष्ट्र नीती स्पष्ट करते. मित्राचा मित्र हा मित्र आणि शत्रुचा मित्र हा पण राज्याचा मित्र त्यामुळे परराष्ट्र नीती अवलंबविताना ही मित्र संकल्पना आजही तितकीच प्रासंगिक आहे. परराष्ट्र नीती बाबत कौटिल्यांनी स्वतंत्र विचार आपल्या मंडल सिद्धांतामध्ये मांडलेले आहेत. राज्यासाठी मित्र आणि शत्रू असणाऱ्या विविध चक्राकार राज्यांची 11 संख्या कौटिल्यांनी सांगितले आहे. साधारणतः शेजारी असणारे राष्ट्र हे राज्याचे शत्रू राष्ट्र असते. शेजारी राज्याचा शेजारी राज्य हे आपले मित्र राष्ट्र होऊ शकते त्यामुळे राजाने शेजारी राष्ट्राविषयी धोरण आवलंबविताना सावधगिरी बाळगावयास हवे असे सांगितले आहे. वर्तमान भारतीय विदेश नीती आखताना कौटील्यांची ही मित्र संकल्पना खूप उपयोगी पडू शकते.

**6. गुणवत्ता आणि पात्रतेला प्राधान्य :**

कौटिल्य आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी शासन आणि प्रशासनात पात्रता आणि गुणवत्तेला महत्त्व दिले आहे. अष्टप्रधान मंडळाची रचना पाहता शिवाजी महाराजांनी जात, धर्म, वर्ण अथवा वंश यांना स्थान दिले नाही. शिवाजी महाराजांच्या मुलकी आणि लष्करी प्रशासनात सर्व जात- धर्माचे लोक होते. किंबहुना अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या तत्कालीन मांग, महार, चांभार, ढोर अशा तत्त्सम

जातीतील लायक, गुणवान निष्ठावंतांना त्यांनी स्थान दिले आहे. शिवाजी महाराजांच्या प्रशासनात जसे ब्राह्मण होते तसेच मुसलमानही होते. कौटिल्यांनी राजा हा देवाचा अंश मानलेला आहे त्यामुळे तो उच्चकुलीन असावा असे म्हटले आहे. परंतु छत्रपतींनी मात्र गुणवत्ता आणि निष्ठा या दोनच बाबींना प्राधान्य दिलेले आहे.

**7. कल्याणकारी राज्य :**

कौटिल्यांनी प्रबळ केंद्रीय सत्तेचा पुरस्कार करताना राज्य हित आणि राज्याच्या संरक्षणाला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. तर शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संरक्षण आणि हिताबरोबरच रयतेच्या कल्याणाला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. स्वराज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी उपेक्षित, वंचित यांच्या कल्याणाला महाराजांनी विशेष महत्त्व दिले आहे. शेतकऱ्यांना शेतसारा माफी, बिनव्याजी कर्ज, दुष्काळी परिस्थितीत अन्न-धान्याचे वाटप अशा वेगवेगळ्या माध्यमातून महाराजांनी मदत केली आहे. स्वराज्यातील रयतेसाठी महाराजांनी विहीरी, पाणवठे, रस्ते बांधल्याची नोंद मिळते. शिवाय लष्करी मोहिमांच्या वेळी रयतेच्या भाजीच्या देठालाही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश त्यांनी सैनाला दिलेले होते. याचा अर्थ छत्रपतीचे शासन हे कल्याणकारी राज्याचे उत्तम उदाहरण होते.

**8. धर्माधिष्ठित आणि धर्मसंहिष्णू प्रशासन :**

कौटिल्यांचा काळ हा प्राचीन आहे. राजसत्तेला धर्मसत्तेची मान्यता आवश्यक होती किंबहुना राजसत्ता आणि धर्मसत्ता या सोबतच चालत असत. त्यामुळे राज्य आणि प्रशासनावर धर्मसत्तेचा जबरजस्त पगडा दिसून येतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड हा मध्ययुगीन आहे. सभोवतालच्या मुस्लिम आक्रमणापासून देव, देश आणि धर्म यांचे संरक्षण महाराजांनी केले परंतु त्यासाठी धर्मांधता दाखवण्याची गरज त्यांना पडली नाही. स्वराज्याच्या रुपाने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदूपदपादशाहीची स्थापना तर केली परंतु धर्मसंहिष्णू पध्दतीने. मोठ्या कुशलतेने तत्कालीन स्वराज्याची लढाई त्यांनी धार्मिक न ठेवता राजकीय स्वरुपाची बनवली त्यामुळे स्वराज्याच्या उभारणीत मुस्लिम लोकांचेही सहकार्य घेता आले. शिवाजी महाराजांच्या लष्करी आणि मुलकी प्रशासनातील मुस्लिम मावळ्यांचा समावेश पाहता त्यांचे प्रशासन हे धर्माधिष्ठित असले तरी ते धर्मसंहिष्णू नक्कीच होते हे लक्षात येते.

**9. केंद्रीकरण विरुद्ध विकेंद्रीकरण** :

शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ हे तुलनेने अधिक केंद्रीकृत शासन व्यवस्थेचा पुरस्कार करते. याउलट, कौटिल्याचे सप्तांग प्रारुप अधिक विकेंद्रित दृष्टिकोनाचा स्विकार करते. विविध राज्य घटकांच्या परस्परावलंबनावर भर देतांना कौटिल्य कार्य आणि जबाबदारी यांचे अधिक प्रमाणात विभाजन करताना दिसून येतात. स्वराज्याच्या तुलनेत मौर्यांचे साम्राज्य हे फार मोठे आणि विशाल होते. त्यामुळे प्रशासनाच्या सोयीसाठी विविध स्तर आणि यंत्रणा होत्या परंतु आकाराने लहान का असेना स्वराज्यात शिवाजी महाराजांनी प्रशासनाची आखलेली चौकट ही शिस्तीवर आधारलेली होती. तुलनेने राजकीयदृष्ट्या शिवाजी महाराजांचा कालखंड हा प्रचंड धामधुमीचा होता. सभोवताली विविध मुस्लिम शाह्या व इंग्रज, डच, पोर्तुगीज, फ्रेंच या परकीय सत्ता अस्तित्वासाठी लढत होत्या. त्यांच्या कार्यकाळात संघर्ष आणि युद्धे ही नित्याचीच होती त्यामुळे कदाचित शिवकालीन प्रशासन व्यवस्था ही मौर्यकाळाच्या तुलनेत अधिक केंद्रीकृत होती.

**10. लष्करी व्यवस्थेवर भर :**

दोन्ही व्यवस्था मजबूत सैन्याचे महत्त्व अधोरेखित करतात. शिवाजी महाराजांचे सेनापती आणि कौटिल्य यांचे दंड हे राज्यकारभारात लष्कराची महत्त्वाची भूमिका प्रतिबिंबित करतात. शिवकाळात वतनदारी पध्दती बंद करुन रोख पगारीची पद्धती अवलंबिण्यात आली होती. शिवाजी महाराजांनी घोडदळ, पायदळासोबत तोफखाना विकसित केला होता. लष्करीदृष्ट्या शिवाजी महाराजांची दूरदृष्टी ही अधिक होती. अरबी समुद्रात स्वतंत्र आरमार उभे करुन त्यांनी सागरी सीमा सुरक्षित करण्याच्या प्रयत्न केला होता. भारताला भविष्यातील धोका हा समुद्रमार्गे आहे हे शिवाजी महाराजांनी त्याकाळी ओळखले होते.

## निष्कर्ष

1. शिवकालीन प्रशासन व्यवस्था ही मुख्यत्वे अष्टप्रधानमंडळावर आधारित असून शिवाजी महाराजांच्या पश्चातही राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्था टिकवण्यात अर्थात स्वराज्याचे रुपांतर साम्राज्यात होण्यामध्ये अष्टप्रधानमंडळाची भूमिका महत्वाची राहिलेली आहे. मौर्यकालीन राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्था ही सुद्धा मुख्यत्वे कौटील्यांच्या सप्तांग सिद्धांतावर आधारलेली आहे. तात्पर्य, दोन्ही कालखंडातील राजकीय व्यवस्थेचे यश हे अनुक्रमे अष्टप्रधानमंडळ आणि सप्तांग सिद्धांत यांचे आहे.
2. अष्टप्रधानमंडळावर आधारित शिवकालीन प्रशासन व्यवस्थेत शोषणावर आधारित वतनदारी आणि जमीनदारी पद्धती मोडीत निघाल्यामुळे रयतेचे शोषण थांबलेले आहे. शिवाजी महाराजांचा हा निर्णय स्वराज्याला स्थैर्य देणारा होता.
3. सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक विषमता दूर करण्यामध्ये शिवकालीन अष्टप्रधानमंडळाची महत्वाची भूमिका आहे. शिवाजी महाराजांच्या पश्चातही मराठा साम्राज्य टिकवण्यात अष्टप्रधानमंडळाची महत्वाची राहिलेली भूमिका आहे.
4. शिवकालीन अष्टप्रधानमंडळाचा प्रभाव वर्तमान भारतीय प्रशासनावर दिसून येतो. भारतीय संसदीय व्यवस्थेतील पंतप्रधान हे पद अष्टप्रधानमंडळातील पेशव्याशी साम्यता दर्शवते. अष्टप्रधानमंडळातील पेशव्याचे अधिकार, कार्य आणि स्थान हे वर्तमान पंतप्रधाना प्रमाणे आहेत. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात राजा हा नामधारी तर पेशवा हा कार्यकारी झाला होता. वर्तमान भारतीय संसदीय प्रणालीमध्ये राष्ट्रपती हा नामधारी आणि पंतप्रधान कार्यकारी आहे.

5. कौटिल्यप्रणीत सप्तांग सिद्धांतावर आधारलेल्या मौर्य साम्राज्याचा वारसा आणि अष्टप्रधान मंडळावर आधारित प्रशासकीय आणि राजकीय व्यवस्थेचा प्रभाव हा भारतीय प्रशासनावर खोलवर पडलेला दिसतो. मौर्यानंतर सत्तेत आलेल्या अनेक राजघराण्यांनी आपल्या प्रशासकीय व्यवस्थेसाठी हेच प्रारूप अवलंबवलेले दिसते. तर मराठा साम्राजाच्या ऱ्हासानंतर ब्रिटिश वसाहतवादी प्रशासनात छत्रपती शिवाजी महाराजांचे अनेक पुरोगामी तात्विक मूल्य स्वीकारलेले दिसतात.

6. पारदर्शक, गतिमान आणि भ्रष्टाचारमूक्त प्रशासनाचे उत्तम उदाहरण हे होन्ही प्रशासन व्यवस्था होत्या. कौटिल्याने भ्रष्टाचाराबाबतीत सांगितलेल्या क्रूर शिक्षा या आजच्या काळात कालबाह्य मानल्या जातात परंतु भ्रष्टाचार कोण-कोणत्या पद्धतीने होऊ शकतो याची कौटिल्याने दिलेली उदाहरणे आजच्या प्रशासनासाठी मार्गदर्शक ठरू शकतात.

- **समारोप :**

कौटिल्यांचे अर्थशास्त्र हे राज्यशास्त्र, प्रशासन आणि अर्थशास्त्रातील एक मुलभूत ग्रंथ आहे, जो शासन, प्रशासन, राजकीय रणनीती, व्यवस्थापन आदी क्षेत्रात मौलिक ज्ञानाची भर घालतो; तर शिवकालीन आज्ञापत्र राज्यकारभाराचे धडे देतो. कौटिल्यांनी मांडलेली राज्याची संकल्पना वर्तमान काळाशी बऱ्याच प्रमाणात सुसंगत आहे. त्यांनी सांगितलेल्या सात अंगातील परस्पर सहकार्य आणि समन्वय प्रशासनाला सुशासन आणि गतिमानता प्रदान करते. अष्टप्रधान मंडळ आणि सप्तांग प्रारूप हे दोन्ही भारतीय प्रशासनासाठी अत्याधुनिक दृष्टिकोन प्रदान करतात. शिवाजी महाराजांच्या व्यावहारिक दृष्टीकोनातून विकसित झालेली प्रशासकीय व्यवस्था आणि कौटिल्यांची सैद्धांतिक मांडणी दोन्ही भारतीय प्रशासनास संरचित, कार्यक्षम आणि गतिमान दृष्टी प्राप्त करून देतात. दोघांचेही विचार भारताचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आणि आंतरराष्ट्रीय वारसा समृद्ध करतात. राज्यकारभार, राजकारण आणि प्रशासन क्षेत्रातील त्यांचे योगदान पाहता; प्रशासन हे जसे शास्त्र आहे तशी ती एक कला सुद्धा आहे हे अधोरेखित होते.

## संदर्भ

1. र. प. कंगले, कौटिलीय अर्थशास्त्र सटीप मराठी भाषांतर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई 1982
2. शर्मा रामशरण, प्राचीन भारत में राजनीतिक विचार एवं संस्थाएं, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, 2005
3. शेजवलकर त्र्य. श. शिवचरित्र प्रस्तावना आणि आराखडा, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई. 1964.
4. देशमुख विजयराव, शककर्ते शिवराय, खंड 2, छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती 2010
5. खोले विलास (संपा.) आज्ञापत्र, लोकवाडमय गृह प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती 2010
6. कुलकर्णी अ. रा. (संपा.) रामचंद्रपंत आमात्यांचे आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे 2000
7. देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई, द्वितीय आवृत्ती 2007.
8. केळूसकर कृ. अ., (संपा. राजन गवस) छत्रियकुलावंतस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई, पुनर्मुद्रण 2019.
9. मेहेंदळे गजानन, श्री राजा शिवछत्रपती (भाग 1 व 2), डायमंड पब्लिकेशन्स पुणे, प्रथम आवृत्ती 1999.

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation